तातडीचे/ कालमर्यादित

ISO 9001:2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
जा.क्र.नासुके/१/कावि/ ९२५ /२०१४
दि. २४/४/२०१४

विषय :- **"नागरिकांची सनद" बाबत. . .**

**परिपत्रक,**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ मधील तरतुदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने **"नागरिकांची सनद"** दर्शनी / ठळक जागी त्वरीत लावणे आणि त्याची प्रत नागरिकांनी मागणी केल्यास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सर्व विभागांची **"नागरिकांची सनद"** समान असावी व नागरिकांना सहज समजावी म्हणून नमुना तयार करणेत आला होता. **"यशदा"** व **"जनवाणी"** या संस्थांच्या अभिप्रायाप्रमाणे अंतिम केला आहे. आदेश क्र.नासुके/१/कावि/११/२०१४ दि.६/१/२०१४ अन्वये **"नागरिकांची सनद"** प्रसिध्द करणेत आली आहे.

शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध नियम, २०१३ मधील नियम ३(२) नुसार प्रत्येक अनुवर्ती वर्षाच्या २ मे रोजी प्रत्येक कार्यालयाकडून **"नागरिकांची सनद"** अद्ययावत करण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र शासन तथा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सुधारित धोरण, योजना, नियम किंवा आदेश इत्यादीनुसार आपल्या विभागाची **"नागरिकांची सनद"** अद्ययावत करावयाची आवश्यकता असल्यास परिपूर्ण प्रस्ताव मा.आयुक्तसो यांचे मान्यतेसाठी दि.२८/४/२०१४ अखेर नागरी सुविधा केंद्र विभागामार्फत पाठविणेत यावा.

(राजीव जाधव)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

सर्व संबंधित विभागप्रमुख,
विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

प्रत,

मा.आयुक्त कक्ष, माहितीसाठी.